वाचले:-
१ श्री. सुर्यवंशी गोपाळ नामदेव,सफाई सेवक यांचा दिनांक 30/12/2024 रोजीचा स्वेछा सेवानिवृत्ति मिळणेबाबतचा अर्ज.
२ क्षेत्रीय अधिकारी, ड क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील पत्र क्रमांक डक्षे/आ/9/कावि/08/2025 दिनांक 28/01/2025
३ महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्तिवेतन नियम 1982 मधील नियम 66
४ अधिकार प्रदान आदेश क्रमांक प्रशा/1/कावि/1175/2013 दिनांक 29/08/2013

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी 411 018.
सामान्य प्रशासन विभाग
क्र.साप्रवि/5/कावि/152/2025
दिनांक १०/०२/२०२५

विषय:- श्री. सुर्यवंशी गोपाळ नामदेव , सफाई सेवक
( संगणक क्रमांक 7394 ) यांना स्वेच्छा सेवानिवृत्ति मंजूर करणेबाबत......

आदेश,

श्री. सुर्यवंशी गोपाळ नामदेव , हे पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील सफाई सेवक या गट ड मधील पदावर ड क्षेत्रीय आरोग्य विभाग अंतर्गत ड क्षेत्रीय आरोग्य 2 येथे कार्यरत आहेत. त्यांनी दिनांक 30/12/2024 रोजीच्या अर्जान्वये वैयक्तीक कारणास्तव स्वेच्छानिवृत्ति मिळणेबाबत विनंती केली आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम 1982 मधील नियम 66 नुसार कर्मचा-याची 20 वर्ष इतकी अर्हताकारी सेवा पूर्ण झाल्यानंतर नियुक्ती प्राधिका-यांस 3 महिन्याची लेखी नोटीस देवून सेवेतून केव्हांही सेवानिवृत्त होता येईल अशी तरतूद आहे. आदेश क्रमांक प्रशा/२/कावि/५४६/२०१६, दिनांक ०७/१०/२०१६ अन्वये महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी / कर्मचा-याने स्वेच्छा निवृत्तीबाबत लेखी नोटीस (तीन महिने अगोदर) देऊन स्वतःहून सेवानिवृत्त मिळणेकामी अर्ज दाखल केला आहे अशा अधिकारी / कर्मचा-यास त्याने दिलेल्या तीन महिन्यांच्या लेखी नोटीशीची तीन महिन्यांची मुदत संपल्यानंतरच्या लगतच्या दिनांकास मध्यान्हनंतर महापालिका सेवेमधून सेवानिवृत्त करण्यात यावे. असे आदेश पारित करण्यात आले आहेत.

श्री. सुर्यवंशी गोपाळ नामदेव , यांच्या सेवानोंद पुस्तकामधील नोंदी नुसार त्यांची जन्मतारिख 01/06/1970 अशी असून दिनांक 15/05/1999 रोजी ते मनपा आस्थापनेवरील मेहरत पदावर रूजू झाले आहेत. दिनांक 30/03/2025 पर्यंत त्यांची मनपामधील एकूण सेवा 25 वर्ष 10 महिने 15 दिवस इतकी पूर्ण होत आहे.त्यामध्ये त्यांचा 0 दिवस कालावधी विनावेतनी केला आहे.

क्षेत्रीय अधिकारी,ड क्षेत्रीय कार्यालय यांनी उपरोक्त वाचले क्र.2 रोजीचे पत्रान्वये श्री. सुर्यवंशी गोपाळ नामदेव , सफाई सेवक, यांचें कडून मनपाचे वाहन कर्ज, संगणक कर्ज, घरदुरुस्ती कर्ज, घरबांधणी कर्ज, कामगार कल्याण निधी कर्ज व वैद्यकीय अग्रीम येणे बाकी नाही. तसेच सद्यस्थितीत त्यांची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नाही, असा अहवाल सादर केला असून, त्यांना स्वेच्छासेवानिवृत्ति मंजूर करणेस स्पष्ट शिफारस केलेली आहे.

सबब श्री. सुर्यवंशी गोपाळ नामदेव, सफाई सेवक, यांनी दिनांक 30/12/2024 रोजीच्या अर्जान्वये स्वेच्छासेवानिवृत्ति मिळावी म्हणून केलेली विनंती क्षेत्रीय अधिकारी,ड क्षेत्रीय आरोग्य विभाग यांचेकडील शिफारस व महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ति वेतन नियम 1982 मधील उक्त तरतूद विचारात घेऊन श्री. सुर्यवंशी गोपाळ नामदेव ,सफाई सेवक यांना दिनांक 30/03/2025 रोजी मध्यान्हंतर महापालिका सेवेतून स्वेच्छासेवानिवृत्ति देण्यास या आदेशान्वये मान्यता देण्यात येत आहे.

श्री. सुर्यवंशी गोपाळ नामदेव, यांना निवृत्ति वेतन,सेवाउपदान इ.रकमा अदा करण्यासाठी संबंधित विभागाने आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करून प्रकरण त्वरीत लेखाविभागाकडे सादर करावे. लेखाविभागाने श्री. सुर्यवंशी गोपाळ नामदेव, सफाई सेवक याचेकडून मनपाचे घरबांधणी कर्ज, वाहनकर्ज, संगणक कर्ज,तसेच वैद्यकीय अग्रिम इत्यादी पैकी अथवा अन्य काही रक्कम येणे बाकी आहे काय?या बाबत खातरजमा करावी व त्यांचे कडून काही येणे बाकी रक्कम असल्यास ती त्यांना देय असलेल्या रकमेतून वसूल करून अंतिमत: देय रक्कम त्यांच्या स्वेच्छा सेवानिवृत्तिच्या दिनांकास अदा करावी.तथापी लेखापरीक्षणार्थ येणे रक्कम निघाल्यास ती श्री. सुर्यवंशी गोपाळ नामदेव यांनी भरणे बंधनकारक राहील.

प्रस्तूत आदेशाची नोंद त्यांच्या सेवानोंद पुस्तकामध्ये घेण्यात यावी.

उप आयुक्त
सामान्य प्रशासन विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - 411018.

प्रति,
श्री. सुर्यवंशी गोपाळ नामदेव , सफाई सेवक
२/-प्रकरणी आपले स्वेच्छा सेवानिवृत्तीनुसार लाड कमिटीच्या शिफारशीप्रमाणे वारस नेमणुकीसाठी वारसपात्र व्यक्तीचा नोकरी अर्ज सेवानिवृत्तीच्या दिनांकापासुन १ वर्षांच्या आत मुदतीत सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.
प्रत :-
1) लेखा विभाग 2) लेखा परीक्षण विभाग 3) सामान्य प्रशासन टेबल क्र.7,10,12,14,15 4) सामान्य प्रशासन विभाग-संगणक कक्ष 5) दूरसंचार विभाग 6) कामगार कल्याण विभाग 7) विद्युत विभाग 8) पिंपरी चिंचवड मनपा कर्मचारी महासंघ 9) पिंपरी चिंचवड मनपा सेवकांची पतसंस्था
10) ड क्षेत्रीय आरोग्य 2 विभाग-
2/- सोबत श्री. सुर्यवंशी गोपाळ नामदेव, सफाई सेवक यांचे मूळ सेवानोंद पुस्तक आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविणेत येत आहे.